महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३८१/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. १६८ दिनांक ११ / ०९ /२००८

**विषय : अधिकारी / कर्मचारी यांना अनुज्ञेय असलेल्या सरासरी वेतनावरील रजा (अर्जित रजा) साठविण्याची मर्यादा वाढविणेबाबत.**

.......

पूर्वीच्या म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवाविनियमाच्या परिशिष्ट 'क', 'ख' आणि 'ग' मध्ये समाविष्ट असणारे कर्मचारी सेवाविनियम क्र.४३, ४४ व ४५ मधील तरतुदीनुसार सरासरी वेतनावरील रजा मिळण्यास पात्र आहेत. तसेच विद्यमान तरतुदीतनुसार सरासरी वेतनावरील रजा साठविण्याची मर्यादा २४० दिवस इतकी आहे. तथापि, याबाबत महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अरजा/२४०१/८/सेवा-९ दिनांक १५.०१.२००१ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांकरिता अर्जित रजा साठविण्याची कमाल मर्यादा २४० ऐवजी ३०० दिवस केली असल्याने महावितरण कंपनीत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय असलेल्या सरासरी वेतनावरील रजा साठविण्याची कमाल मर्यादा २४० दिवसांवरून ३०० दिवस इतकी वाढविण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. या संदर्भात सर्वंकश विचारांती मा.व्यवस्थापीय संचालक यांनी संचालक (वित्त) व संचालक (संचलन) यांच्याशी विचारविनिमय करून म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवाविनियम क्र.४३, ४४ व ४५ मध्ये बदल करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

३. या अनुषंगाने म.रा.वि.मंडळ सेवाविनियमाच्या परिशिष्ट 'क', 'ख' आणि 'ग' मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सेवाविनियम क्र.४३, ४४ व ४५ अनुसार अनुज्ञेय असलेल्या **सरासरी वेतनावरील रजा (अर्जित रजा) साठविण्याची सद्याची २४० दिवसांची मर्यादा वाढवून ३०० दिवस इतकी करण्यात येत आहे.**

४. परिणामी सेवाविनियम क्र.३९ (क) नुसार सेवानिवृत्ती दिनांकाच्या, सक्तीच्या, स्वेच्छेच्या किंवा सेवानिवृत्तीच्या अगोदरच्या दिवशी कर्मचाऱ्याच्या खात्यावर शिल्लक असलेल्या रजेच्या रोखीकरणाकरिता विद्यमान २४० दिवसाची कमाल मर्यादा ३०० दिवसापर्यंत वाढविण्यात यावी.

५. सरासरी वेतनावरील रजा (अर्जित रजा) साठविण्याची विद्यमान कमाल मर्यादा ज्या ज्या प्रसंगी/प्रकरणी लागू आहे त्या सर्व प्रसंगी/प्रकरणी भावी परिणामाने (Prospective Effect) म्हणजेच हे परिपत्रक जारी केलेल्या तारखेपासून लागू करण्यात येईल.

६. म.रा.वि.मंडळ सेवाविनियम क्र.४३, ४४ आणि ४५ मधील इतर तरतुदी अबाधीत राहतील.

७. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि. वितरण कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सु.य.पाटील

*( सु.य.पाटील )*
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रत :
१) क्षेत्रीय कार्यालयातील उप विभागीय आणि त्यावरील स्तराच्या कार्यालयांना महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.
२) महावितरण कंपनीच्या निगम कार्यालयातील सर्व विभाग/कक्ष प्रमुख.

*K/Adm.Cir.F.N.381-E.L.Extension*